## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

क्र.म.वि. 1860 दिनांक:-- 07/12/2010

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
गोंदिया शिक्षण संस्था, गोंदिया.
व्दारा-- मनोहरभाई पटेल इंस्टिटयुट ऑफ इंजिनिअरींग अॅण्ड टेक्नॉलॉजी,
शहापूर, भंडारा

विषय :-- सत्र २०१०--११ पासुन नवीन महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :-- शासन निर्णय क्र. संकीर्ण--२०१०/(१६५)/२०१०--११ तांशि--४, दिनांक ३० जुन, २०१०.

महोदय,

मा.कुलगुरुंच्या आदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भांकित पत्रानूसार राज्य शासनाने आपल्या संस्थेला सत्र २०१०--११ पासुन नवीन महाविद्यालय सुरु करण्यास दिलेल्या परवानगीनुसार व स्थानिय चौकशी समितीच्या केलेल्या शिफारशीस मा. कुलगुरुंनी विव्दत परिषदेच्या वतीने म.वि. अधिनियम १९९४ च्या कलम १४(७) अंतर्गत नवीन महाविद्यालयास सत्र २०१०--११ पासून विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण खालील अटींच्या अधिन राहून प्रदान केले आहे.

| संस्थेचे नांव | महाविद्यालयाचे नांव व ठिकाण | विद्याशाखा /अभ्यासक्रम | विद्यार्थी संख्येचे निकष |
|---|---|---|---|
| गोंदिया शिक्षण संस्था, गोंदिया. | मनोहरभाई पटेल इंस्टिटयुट ऑफ इंजिनिअरींग अॅण्ड टेक्नॉलॉजी, शहापूर, भंडारा | १. इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड कॉम्प्युनिकेशन इंजिनिअरींग | ६० विद्यार्थी |
| | | २. मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० विद्यार्थी |
| | | ३. इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी | ६० विद्यार्थी |
| | | ४. कॉम्प्युटर सायंस अॅण्ड इंजिनिअरींग | ६० विद्यार्थी |
| | | ५. सिव्हील इंजिनिअरींग | ६० विद्यार्थी |

**प्रथम संलग्निकरण खालील अटींच्या अधिन प्रदान करण्यात येत आहे**

१. उपरोक्त नवीन महाविद्यालयाला देण्यात आलेले प्रथम संलग्निकरण विद्यापीठाद्वारे गठीत स्थानिय चौकशी समितीने महाविद्यालयास भेट देऊन सादर केलेल्या अहवालात दर्शविलेल्या त्रृटी विहीत कालावधीत पूर्ण करण्याच्या अटीवर देण्यात येत आहे. (समितीच्या अहवालाची प्रत सोबत जोडलेली आहे.)

२. संदर्भांकित शासन परवानगीमध्ये नमूद केलेले संपूर्ण अटीचे पालन संस्थेने/महाविद्यालयाने विहीत कालावधीमध्ये पूर्ण करण्याच्या अटीवर संलग्नीकरण देण्यात येत आहे.

३. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ८२ (५) व ८३ (५) नुसार ही मान्यता शैक्षणिक वर्ष २०१०--११ साठी देण्यात येत आहे. ही मान्यता फक्त शैक्षणिक २०१०--११ पुरतीच मर्यादीत राहील. यावर्षी नवीन महाविद्यालय सुरु न केल्यास ही मान्यता आपोआप रद्द होईल.

४. विद्यार्थी संख्येचे निकष शासन निर्णय क्र. एनजीसी--१०९३ /(५९१८)/मशि--३, दिनांक १९ जुन, १९९५ प्रमाणे महाविद्यालयावर बंधनकारक राहतील त्याचे उलंघ्घन झाल्यास शासन निर्णय दि. २१.०१.२००६ नुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

५. विद्यापीठाने विहीत केलेल्या निकषानुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहीत केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार महाविद्यालयांनी अध्यापक वर्ग/ कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक असुन इतर सर्व आवश्यक पायाभुत सोयी उपलब्ध करुन त्याची खात्री विभागीय सहसंचालकांनी करुन विद्यापीठास तसे प्रमाणपत्र देण्याच्या अधिन मान्यता देण्यात येत आहे.

६. उपरोक्त अभ्यासक्रमाची परवानगी प्राचार्य व नियमित शिक्षक भरण्याच्या अटीवर देण्यात येत आहे. प्राचार्य व नियमित शिक्षकांची नियुक्ती न केल्यास विद्यार्थ्यांना दिलेले प्रवेश रद्द होतील.

७. उपरोक्त महाविद्यालय कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास आपले महाविद्यालय तयार असुन त्या आशयाचे हमीपत्र महाविद्यालयाने विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) नागपूर यांना सादर करण्याचे अटीवर ही मान्यता देण्यात येत आहे.

८. प्रथम संलग्निकरण प्राप्त झाल्यानंतर ज्या महाविद्यालयांनी वरील नमुद विविध अटी व शर्तीची पुर्तता केली नाही अशा महाविद्यालयांना पुढील वर्षाकरीता निरंतर संलग्निकरण देता येणार नाही व जर अशा महाविद्यालयांनी पुढील सत्रासाठी प्रवेश प्रक्रिया केली तर प्रवेशित विद्यार्थ्यांची परीक्षा विद्यापीठ घेणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील.

९. ज्या अभ्यासक्रमाचे अभ्यासक्रमीका, अध्यादेश विद्यापीठात तयार नाही असे अभ्यासक्रम/ विषय महाविद्यालयांनी सुरु करु नये.

१०. कायम विना अनुदान तत्वावर संस्थेस महाविद्यालय आर्थिकदृष्टया चालविणे शक्य व्हावे यासाठी संस्थेने विद्यार्थ्यांकडून विद्यापीठ/ शिक्षण शुल्क समितीने ठरविलेल्या शुल्कांनुसारच शुल्क आकारावे.

११. महाविद्यालयाच्या बांधकामाचे मोजमाप करण्याकरीता अभियंता समिती महाविद्यालयाला भेट देऊन सादर केलेल्या अहवालातील अटींच्या अधिन मान्यता देण्यात येत आहे.

१२. वरील सर्व अटींची पुर्तता तसेच पुढील निरंतर संलग्निकरणाकरीता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद/ राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद/ बार कौन्सिल ऑफ इंडिया इत्यादी शिखर संस्थांनी घालुन दिलेल्या अटींची पुर्तता विहीत कालावधीत संस्थेने न केल्यास पुढील संलग्निकरण स्थगित होईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची/ संस्थेची राहील याची नोंद घ्यावी.

१३. महाविद्यालयातील सदर अभ्यासक्रमाचे पूढील वर्षासाठी निरंतर संलग्नीकरणाकरीता शुल्कासह आवेदनपत्र दि. ३१ ऑगष्ट पूर्वी विद्यापीठात सादर करावे.

कृपया कळावे.

आपला

( फु. ख. भगत )
सहायक कुलसचिव (म.वि.)

-- २ --

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

( सेंट्रल प्रोव्हिंसेस शासन, शिक्षण विभागाची अधिसुचना क्रमांक ५१३, दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित व
महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ व्दारा संचालीत राज्य विद्यापीठ )

## महाविद्यालयीन शाखा

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपूर- ४४० ००१, दुरध्वनी क्रमांक ०७१२ -२५२९९३२
फॅक्स नं. ०७१२-२५५५७०१, Email ID : ar-cs@nagpuruniversity.org


क्र.म.वि. 1415 C/ 135
दिनांक 01/ 4 /२०१९

प्रती,

सचिव,
गोंदिया एज्युकेशन सोसायटी,
व्दारा – मनोहरभाई पटेल इंस्टिटयुट ऑफ इंजि.ॲण्ड टेक्नॉ.,
शहापूर, भंडारा.

विषय:– अभ्यासक्रमात दुरुस्तीबाबत.

संदर्भ :– १) आपले पत्र क्र. ६४/२०१०–११, दि. १६.०३.२०११.
२) शासन निर्णय क्र. टिईएम–२०१०/(१६५/१०)/तांशि–४, दि. २६ जुलै, २०१०.

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेव्दारा संचालीत मनोहरभाई पटेल इंस्टिटयुट ऑफ इंजि.ॲण्ड टेक्नॉ., शहापूर, भंडारा या महाविद्यालयाला दि. ७.१२.२०१० रोजी दिलेल्या प्रथम संलग्नीकरणाचे पत्रात कॉम्प्युटर सायंस ॲण्ड इंजिनिअरींग या नांवाने संनग्नीकरण प्रदान करण्यात आलेले होते. परंतु संदर्भ क्र. २ नुसार शासनाने केलेल्या दुरुस्तीप्रमाणे कॉम्प्युटर सायंस ॲण्ड इंजिनिअरींग या विषयाऐवजी " **कॉम्प्युटर इंजिनिअरींग** " असे वाचण्यात यावे.

कृपया कळावे.

आपला विश्वासु

( फु. ख. भगत )
सहायक कुलसचिव (म.वि.)

प्रतिलीपी,
१) मा.परीक्षा नियंत्रक,
२) सहायक कुलसचिव (सामान्य परीक्षा व चौकशी),
३) सहायक कुलसचिव (व्यावसायिक परीक्षा),
४) सहायक कुलसचिव (गोपनिय विभाग),
} रा.तु.म.नागपूर विद्यापीठ, नागपूर.

C:\BAJAPEYEE\NEW LETTERS FILE.doc,